सं.फौ.ख.क्र.१८३/२०२२
श्रीराम सिटी वि. भगवान
नि.क्र.१६ खाली

**<u>साक्षीदार क्र. १ चा शपथेवर पुढील सरतपास ॲड.श्री. पी.एच.रघुते यांच्या मार्फत सुरु:</u>**

४. मी अभिलेखावर माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे. सदर शपथपत्रातील मजकुर माझे सांगण्याप्रमाणे लिहीला आहे व तो मजकुर वाचुन व समजुन त्यावर मी सही केली आहे तसेच त्यावर माझ्या वकीलांची सही आहे. त्यामधिल मजकुर खरा व बरोबर आहे.

५. मी अभिलेखावर दस्तएवेजांची यादी **<u>नि.क्र.१८</u>** दाखल केलेली असुन त्यातील दस्त क्र.१ प्रमाणे अधिकृत/ऑथोराइस पत्राची दिनांक २८.०१.२०२१ रोजीची पडताळीत प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यावर माझी व बॅकेचे संचालक जी.एम.जिलानी यांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्याला **<u>नि.क्र. १९</u>** देण्यात येते. त्यातील दस्त क्र.२ प्रमाणे आरोपीने तक्रारकर्ता बॅकेला दिनांक १०.०१.२०२२ रोजीचा बॅक ऑफ इंडिया, शाखा मांढळ, रूपये ४७,२५२/- चा मुळ धनादेश अभिलेखावर दाखल केला आहे. तो तोच आहे. त्यावर आरोपीची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्याला **<u>नि.क्र.२०</u>** देण्यात येते. त्यातील दस्त क्र.३ प्रमाणे आरोपीने दिलेला धनादेश मी बॅकेमध्ये वटविण्याकरीता टाकला होता व सदर धनादेश न वटता अपूरा निधी या शेरा सह दिनांक २७.०१.२०२२ रोजी परत आला. तो तोच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. रिर्टन मेमोला **<u>नि.क्र.२१</u>** देण्यात येते. त्यातील दस्त क्र.४ प्रमाणे तक्रारकर्ता याने त्याचे अधिकृत वकील श्री.पी.एच.रघुते यांचे मार्फत दिनांक १५.०२.२०२२ रोजी आरोपीला धनादेश रक्कम परत देण्याकरीता नोटीस पाठविली होती. ती तिच आहे. त्यावर माझे वकीलांची सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. नोटीसला **<u>नि.क्र.२२</u>** देण्यात येते. त्यातील दस्त क्र.५ प्रमाणे आरोपीला नोटीस पाठविल्याची दिनांक १५.०२.२०२२ रोजीची पोस्टाची मुळ पावती अभिलेखावर दाखल केली आहे. ती तिच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पोस्टाच्या पावतीला **<u>नि.क्र.२३</u>** देण्यात येते. त्यातील दस्त क्र.६ प्रमाणे आरोपीला नोटीस मिळाल्याची दिनांक २३.०२.२०२२ रोजीची पोहच पावती मूळ अभिलेखावर दाखल केली आहे. ती तिच आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. पोस्टाच्या पावतीला **<u>नि.क्र.२४</u>** देण्यात येते. त्यातील दस्त क्र.७ प्रमाणे तक्रारकर्ता बॅकेने माझे हक्कात विशेष मुखत्यारपत्र दिनांक २८.०१.२०२१ रोजी करून दिले त्याची पडताळीत प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. ती तिच आहे. त्यावर बॅकेचे संचालक जी.एम.

जिलानी, माझी तसेच दोन साक्षीदार नामे सदानंद टी. चराटे व कमलेश मंगी जैन यांच्या सहया आहेत. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. विशेष मुखत्यार पत्राला **नि.क्र.२५** देण्यात येते.

**सरतपास पुर्ण.**
**साक्षीदाराचा उलटतपास घेण्याकरीता प्रकरण पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येते.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

(एन.जे.देशमुख)
न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.,कुही
दि.०८.०८.२०२३

समक्ष,

(एन.जे.देशमुख)
न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.,कुही
दि.०८.०८.२०२३.